महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय
४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, सीबीडी-बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.

दूरध्वनी क्र. ०२२-२२८५०४७१ Email ID: directoriayruralhousing@gmail.com

जा.क्र./राव्यक-ग्रागृ/लेखा(रायो)/अतिक्रमण /१४७१/२०२१ दिनांक:०२/०२/२०२१

प्रति,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद (सर्व).

**विषय:- ग्रामीण भागातील शासकीय जमिनीवरील निवासी अतिक्रमण कायम करणेसाठी दिरंगाई होत असलेबाबत.**

संदर्भः- १. ग्राम विकास विभागाकडील शासन निर्णय क्र. प्रआयो-२०१८/ प्र.क्र.३४८/यो-१०, दि. १६.०२.२०१८
२. मा. मंत्री, कृषी, माजी सैनिक कल्याण यांचे पत्र क्र. मंत्री/कृषी/माजी सैनिक कल्याण/ टिप्पणी/५१/२०२०, दि. ३०.०१.२०२०

उपरोक्त् संदर्भिय पत्र क्र. १ अन्वये सर्वांसाठी घरे – २०२२ या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी ग्रामीण भागातील शासकीय जमिनीवरील निवासी प्रयोजनासाठी केलेली अतिक्रमणे नियमानुकूल करण्याच्या धोरणास शासनाने मान्यता दिलेली आहे.

उपरोक्त् संदर्भिय पत्र क्र. २ अन्वये मा. मंत्री, कृषी, माजी सैनिक कल्याण, महाराष्ट्र राज्य यांनी शासकीय जमिनीवरील निवासी प्रयोजनासाठी केलेली अतिक्रमणे कायम करणेबाबत संबंधितांना आदेश होणेबाबत मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांना विनंती केली आहे. त्याअनुषंगाने आपल्या जिल्हयामध्ये असलेली प्रलंबित अतिक्रमणे नियमानुसार नियमानुकूल करण्याची कार्यवाही करण्यात यावी. सोबत मा. मंत्री, कृषी, माजी सैनिक कल्याण यांचे पत्र माहितीकरिता सादर केलेले आहे.

(डॉ. राजाराम दिघे)
संचालक

प्रत : उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद (सर्व) यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी.

Scanned by CamScanner

६९५/प्रो-१०
३१/१२/२०२०

प्र.मंत्री/कृषी/माजी सैनिक कल्याण/टिप्पणी/५७/२०२०, दि. ३०/०१/२०२०

मंत्री
कृषि, माजी सैनिक कल्याण
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
*www.maharashtra.gov.in*

मंत्री
महाराष्ट्र राज्य

मुख्यमंत्री सचिवालय
04 FEB 2020
4259197
ई-टपाल क्रमांक.....................

दिनांक : ३०/०१/२०२०

प्रति.,

**मा.ना.श्री. उध्दवजी ठाकरे साहेब,**
**मुख्यमंत्री,**
**महाराष्ट्र राज्य, मंत्रालय,**
**मुंबई - ३२.**

तपासून कार्यवाही करावी
मुख्यमंत्री
महाराष्ट्र राज्य

**विषय - ग्रामीण व शहरी भागातील शासकीय जमिनीवरील निवासी अतिक्रमण कायम करणेसाठी दिरंगाई होत असलेबाबत...**

उपरोक्त विषयान्वये, शासकीय जमिनीवरील निवासी कारणासाठी असलेले अतिक्रमणे नियमानुकुल करणेबाबत शासनाने सर्वांसाठी घरे-२०२२ या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी ग्रामीण व शहरी भागातील शासकीय जमिनीवरील निवासी प्रयोजनासाठी केलेली अतिक्रमणे नियमानुकुल करणेसाठी ग्रामीण भागासाठी ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांनी १६ फेब्रुवारी, २०१८ व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रात असलेल्या शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे नियमानुकुल करणेसाठी नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांनी १७ नोव्हेंबर, २०१८ रोजी शासन निर्णय पारीत केलेला आहे.

ग्रामीण व शहरी भागातील अतिक्रमणे ऑनलाईन व ऑफलाईन या दोन्ही प्रणालीचा वापर करुन शासकीय जमिनीवरील निवासी प्रयोजनासाठी केलेली अतिक्रमणे कायम करण्यासंदर्भात संबंधितांना आदेश व्हावेत ही विनंती.

आपला

(दादाजी भुसे)

राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण
महाराष्ट्र राज्य
आवक क्रमांक - 7486-1
आवक दिनांक - 06-01-2021
शाखा - S.S.I Accnts

सहाय्यक संचालक (लेखा) उपसंचालक संचालक

सर्व जिल्ह्यांना पाठवावे

This may be sent to RDD and UD-2 for necessary action
13/12/2020

DS(PW)

श्री. फाळे साहेब

१४/१२/२०२०

R- 4310750

Self Resh

५२१३
१२।३।२०२०
०८४


**महाराष्ट्र शासन**

**महसूल व वन विभाग**

मंत्रालय (मुख्य इमारत), पहिला मजला,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.

दुरध्वनी ०२२-२२८५५९२०    E-mail:- m5.revenue@maharashtra.gov.in


---

**क्र.संकिर्ण-२०२०/सं.क्र.३०/म-५**    **दिनांक :२७.०२.२०२०**

प्रति,

१) अपर मुख्य सचिव, ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई-०१

२) प्रधान सचिव, नगर विकास विभाग (न.वि.-२), मंत्रालय, मुंबई-३२.

५२१३
११।३।२०२०

**विषय :** ग्रामीण व शहरी भागातील शासकीय जमिनीवरील निवासी अतिक्रमण कायम करणेसाठी दिरंगाई होत असलेबाबत.

**संदर्भ :** मा. मंत्री (कृषि, माजी सैनिक कल्याण), मंत्रालय, मुंबई-३२ यांचे पत्र क्र.मंत्री/कृषी/माजी सैनिक कल्याण/टिप्पणी/५१/२०२०, दि.३०.०१.२०२०

महोदय,

विषयांकित प्रकरणाबाबतचे सोबत जोडलेल्या संदर्भाधीन पत्राचे कृपया अवलोकन व्हावे.

२. 'ग्रामीण व शहरी भागातील शासकीय जमिनीवरील निवासी अतिक्रमणे कायम करणे' हा विषय हा महसूल विभागाशी संबंधित नसून आपल्या विभागांशी संबंधित असल्याने संदर्भाधीन मूळ पत्र नगर विकास विभागास व या पत्राची छायांकित प्रत ग्राम विकास विभागास पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडून पाठवित आहे. कृपया हस्तांतरणाची पोच द्यावी, ही विनंती.

आपला,

( रविराज फल्ले )

उप सचिव, महाराष्ट्र शासन

सोबत : वरीलप्रमाणे.

श्री कुटे, सहा

**प्रत:-**

१६।३।२०२० मा. मंत्री (कृषि, माजी सैनिक कल्याण), मंत्रालय, मुंबई-३२ यांचे खाजगी सचिव यांना माहितीस्तव अग्रेषित.

D:\RAHUL\संदर्भ\Ref.३०.२०२०.शासकीय जमिनीवरील अतिक्रमण(मा.श्री.दादाजी भुसे).docx

धो - ९०

दि. १०।१२।२० रोजी प्राप्त

Scanned by CamScanner